मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# चऱ्होलीत विकासाचे नवे पर्व : प्रभाग ३ मध्ये सर्वांगीण विकासाची नवी वाटचाल...

## विकसनशील प्रभाग : 03

**पिंपरी | प्रतिनीधी :** गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय भूमिका निभावताना, आमदार महेशदादा लांडगे यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली प्रभाग ३ मध्ये विकासाचा नवा अध्याय सुरू झाला आहे. नितीन आप्पा काळजे महापौर झाल्यानंतर या भागाच्या प्रगतीला आणखीन बळ मिळाले. चऱ्होलीत आलेल्या मोठ्या गृहनिर्माण प्रकल्पांपासून ते टाऊनशिपमुळे नागरिकांची या भागाला वाढती पसंती दिसून येत आहे.



माझा प्रभाग माझा उमेदवार!

## या ठोस उपाययोजनांवर भर देणार

वाढत्या लोकसंख्येनुसार सांडपाणी व्यवस्थापन यावर लक्ष देऊन काम करणार, सुसज्ज रुग्णालय उभारणीसाठी पाठपुरावा करून रूग्णवाहिका उपलब्ध करूण देण्याचा प्रयत्न करणार, तसेच वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्नशील असेल, गुन्हेगारी नियंत्रण आणण्यासाठी पोलिस प्रशासनाशी समन्वय साधून त्यांच्या मदतीने आमदार महेशदादांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करणार, तरुणांमधील व्यसनाधीनता यांसारख्या गंभीर प्रश्नांवर ठोस उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. भारतीय जनता पक्षाचा सक्षम दावेदार म्हणून आम्ही या सर्व समस्यांवर परिणामकारक काम करण्याचा ठाम निर्धार करून पुढे आलो आहोत.

## शेतकऱ्यांच्या चर्चेतून भूसंपादन

चऱ्होली परिसराच्या सर्वांगीन विकासासाठी शेतकऱ्यांशी चर्चा करून भूसंपादन आरक्षण ताब्यात घेऊन जेष्ठांसाठी नाना नानी पार्क, विरंगुळा केंद्र , युवकांसाठी खेळाची मैदाने विकसित करण्यावर भर देणार आहे.

## शैक्षणिक स्तरावरील कार्य

भविष्यातील पिढी सुशिक्षित अन् मजबूत होण्यासाठी विद्यार्थ्यांना महापालिकेच्या माध्यमातून शालेय साहित्य, खेळाचे साहित्य उपलब्ध करून देणे, स्पर्धा परीक्षा केंद्र उभारणे, शासनाच्या सर्व योजनांचा लाभ माझ्या प्रभागातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविणे, शिष्यवृत्ती, प्रोत्साहनपर बक्षीस, उच्चशिक्षणासाठी शासनाची मदत शैक्षणिक स्तरावर जे काही चांगले देता येईल त्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत.

नागरिकांसाठीच्या भविष्यातील सोयी-सुविधा, प्रभागाचा विकास यावर अजून भर देण्याचे काम आपण नागरिकांनी महापालिका सभागृहात जाण्याची संधी दिल्यास पार पाडणार असल्याची भावना सामाजिक कार्यकर्ते सचिनभाऊ तापकीर यांची आहे.

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली विकासकामे दादांच्या नेतृत्वात पूर्णत्वास जात आहेत. मात्र, चऱ्होलीतील झपाट्याने वाढणारी लोकसंख्या पाहता वीजपुरवठासुरुळीत करणे आहे. चऱ्होलीतील काही भागात स्ट्रीटलाईट दिव्यांचे खांब उभारणे आहे. परिसराची स्वच्छता राखणे महत्त्वपूर्ण आहे. कचरा व्यवस्थापन करणे, ज्यामध्ये घंटागाड्यांचे प्रमाण वाढवणे आहे.

जेष्ठांसाठी आरक्षित जागांचा विकास ज्यामध्ये विरंगुळा केंद्र, नाना नानी पार्क विकसित करणे आहे. चिमुकल्यांसाठी खेळांडूसाठी क्रीडांगणाचा विकास करणे आहे.



## चऱ्होलीचा अभिमान अन् परंपरा असलेला वाघेश्वर महाराज उत्सव



वर्षानुवर्षे चऱ्होलीतील वाघेश्वर महाराज उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. महाशिवरात्रीला साजरा होणारा एक प्रसिद्ध उत्सव आहे. ज्यामध्ये वाघेश्वर मंदिरामध्ये मोठी यात्रा भरते. हे मंदिर पुणे जिल्ह्यातील एक ऐतिहासिक आणि सुंदर ठिकाण आहे, ज्याचा जीर्णोद्धार शिवाजी महाराजांच्या काळात झाल्याच्या नोंदी आहेत. या उत्सवामध्ये चऱ्होलीमध्ये श्री वाघेश्वर महाराज उत्सवाच्या निमित्ताने एक भव्य कुस्तीचा आखाडा आयोजित केला जातो, जो लाल मातीसाठी प्रसिद्ध आहे. हे गाव कुस्ती आणि परंपरा जपणारे म्हणून ओळखले जाते. हे गाव महाराष्ट्रातील मर्दुमकीची परंपरा जपणारे मानले जाते आणि कुस्ती हा त्यांचा एक महत्त्वाचा भाग आहे. राज्यातील नावाजलेल्या कुस्ती आखाड्याचे नियोजन किंवा यशस्वी पार पाडण्यासाठी सचिनभाऊ तापकीर यांचा पुढाकार असतो.



## सर्वांगीण विकासाचे ध्येय

आमदार महेशदादा लांडगे यांच्या विकासवादी दृष्टिकोनामुळे प्रभागाचा चेहरामोहरा बदलत आहे. या विकासाच्या वाटचालीला पुढे नेणे, शासकीय व पालिका यंत्रणेच्या समन्वयातून प्रभागाचा सर्वांगीण विकास साधणे आणि प्रत्येक नागरिकाचे जीवन अधिक सुरक्षित, सुसज्ज आणि सक्षम करणे हेच आमचे आगामी ध्येय आहे

## सांस्कृतिक कार्यक्रमातून समाजात सक्रियता...

नागरिकांच्या आरोग्याला प्राधान्य देत सचिनभाऊ तापकीर यांनी स्वखर्चाने चऱ्होलीमध्ये जागो जागी ओपन जिम उभारून सर्वांसाठी एक उत्तम सुविधा उपलब्ध करून दिली. चऱ्होलीतील नागरिकांसाठी सांस्कृतिक उपक्रमासाठी सुसज्ज असे टाऊनहॉल उभारण्याचा त्यांचा मानस आहे. ज्यातून अनेक महिला-मुलांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळण्यास मदत होईल.

## पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात

आमदार महेश दादा लांडगे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील पूरग्रस्त भागांमध्ये सामाजिक बांधिलकी जपत मदतकार्य राबवले. गोदानेबरोबरच पाचशे पेक्षा अधिक कुटुंबांना जीवनावश्यक वस्तू पुरवण्यात आल्या. सांगली-कोल्हापूर पूरग्रस्तांसाठीही मदत पोहोचवून मानवी संवेदनांचा उत्तम आदर्श ठेवला.